पत्र

जा.क्र मृदसं/मृद-४/संकेतस्थळ/१९८६/२०१६
मृद संधारण व पाणालोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे ४११ ००१, दिनांक- २८/०७/२०१६

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी----------- (सर्व)

**विषय :- मृद व जलसंधारण उपचारांची संकेतस्थळावर नोंद घेणेबाबत.**

**संदर्भ :-** १.अ.शा.पत्र जा.क्र. ३०७७/२०१३, दि.२४/०६/२०१३
२.अ.शा.पत्र जा.क्र. ३१९१/२०१३, दि.०४/०७/२०१३
३.अ.शा.पत्र जा.क्र. २७४/२०१४, दि.१८/०२/२०१४
४.जा.क्र.मृदसं/मृद-४/उपचार-१९९२/२१७/१५ , दि.१३/०२/२०१५
५. अ.शा.पत्रक.मृदसं/मृद-४/उपचार-१९९२/१५२१/२०१५, दि.२९/०७/२०१५
६. जा.क्रं.मृदसं/उपचार-१९९२/१७२४/मृद-४/२०१५, दि.३१/०८/२०१५
७. जा.क्र.मृदसं/मृद-४/उपचार-१९९२/१९६७/२०१५, दि.१२/१०/२०१५
८. अ.शा.पत्रक.मृदसं/मृद-४/उपचार-१९९२/२०७७/२०१५, दि.२०/१०/२०१५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मृद व जलसंधारणाच्या झालेल्या उपचारांची संकेतस्थळावर नोंद घेण्याबाबत सन २०१३ पासून आपणाकडे पाठपुरावा सुरु आहे. तथापी संकेतस्थळावर माहिती भरण्याबाबत आपणाकडून योग्य ती कार्यवाही झालेली नाही.

आपले स्तरावर संकेतस्थळावर माहिती भरण्यास काही अडचणी येऊ नयेत, म्हणून दि.०३/०८/२०१५ ते दि.२६/०८/२०१५ व दि.०७/०९/२०१५ ते दि.१०/०९/२०१५ या कालावधीत सर्व जिल्हयांतील अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित केले होते. तरी दखील कोणत्याही क्षैत्रिय कार्यालयाने संकेतस्थळावर माहिती भरली नसल्याचे आयुक्तालयाच्या निदर्शनास आले आहे. याबाबत मा. आयुक्त, कषि यांनी आढावा घेतला असता, कर्मचारी प्रशिक्षणानंतर १० महिन्याचा कालावधी होऊनही माहिती भरलेली नसल्याने नाराजी व्यक्त केली आहे.

तसेच मा. आयुक्त (कषि) यांनी दि.१२/१०/२०१५ चे पत्रान्वये याबाबत कार्यवाही सुरु न झाल्यास संबंधितांविरुध्द योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, याबाबत सक्त ताकीदही दिली होती. तरी आपणास पुनश्चः कळविण्यात येते की, सन २०१४-१५,सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये हाती घेतलेल्या मृद संधारणाच्या सर्व योजनांतून पूर्ण झालेल्या उपचारांची माहिती संकेतस्थळावर भरणेची उचित कार्यवाही अतितात्काळ पूर्ण करावी.

**संचालक**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**प्रत,**

**विभागीय कृषि सहसंचालक (सर्व) यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**

D:\gore\Gore.docx